साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

कार्यालय : शॉप नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com

श्री.अकील अहमद उर्फ गुड्डूभाई
कार्यकारी संपादक
मो.नं. ९८२२०९४०१४

दैनिक
साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी

epaper
www.sahsik.com

वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १२ अंक : ३१ शुक्रवार २७ जुलै २०१८ मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार (पाटील) (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये

दिनविशेष

* गुरूपौर्णिमा

सुविचार

दु:ख हे दागिन्यासारखं
मिरवू नका!
वाटू शकला तर आपला
आनंद वाटा !!
लोक तुमच्याकडून
आनंदाची अपेक्षा करतात,
पण दु:ख त्यांच्याकडे भरपूर
आहे!!

चारोळी

प्रेम म्हणजे काय असतं?
सागरात पडल्यावरही
घाबरायचं नसतं
कितीही पोहता येत असलं
तर आकंठ बुडून जायचं
असतं!

हसा जरा जपून..

प्रत्येक गोष्ट दोनदा

नवरा पेपरमध्ये एक लेख वाचत होता. ते पान बायकोसमोर फडफडवत तो म्हणाला, 'बघ बघ, यात लिहिलं की पुरुष रोज सरासरी पंधरा हजार शब्द बोलतो आणि स्त्री मात्र तीस हजार'

बायको : हो, पुरुषांना प्रत्येक गोष्ट दोनदोनदा सांगावीच लागते.

नवरा : काय म्हणालीस?

वर्धा जिल्ह्यातील तत्कालीन पोलिस अधिक्षक अंकित गोयल, डीवायएसपी माधव पडीले, पुलगाव ठाणेदार मुरलीधर बुरांडे यांना मा.उच्च न्यायालय नागपूर खंडपीठांनी काढले कारणे दाखवा नोटीस

राष्ट्रीय मानवअधिकार आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. निलेश ओझा

ॲड. ओंकारजी काकडे माजी न्यायाधिश तथा शासकिय अभियोक्ता, हायकोर्ट नागपूर

ॲड. विवेकजी रामटेके जेष्ठ विधितज्ञ, वर्धा

* **मा.न्यायालयासमोर खोटे कागदपत्रे खरे असल्याचे भासवून दै.साहसिकचे मुख्य संपादक रविंद्र कोटंबकार यांना तडीपार करण्यासाठी कट रचल्याप्रकरणी आरोपी अंकित गोयल, तत्कालीन पोलिस अधिक्षक वर्धा, तत्कालीन डीवायएसपी, माधव पडीले व पुलगाव ठाणेदार, मुरलीधर बुरांडे यांना मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी कारणे दाखवा नोटीस काढून ४ आठवड्यात मागितले उत्तर**
* **आरोपी अंकित गोयल, माधव पडीले व मुरलीधर बुरांडे विरोधात मा.उच्च न्यायालयात खोट्या मजकुराचे कागदपत्रे दाखल करुन मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाचा अवमान केल्यामुळे आरोपीं विरोधात भादंविचे कलम १९१, १९२, १९३, १९९, २००, ४६५, ४६६,४८७,४७२,४७४ व १२० (ब) कट रचने अन्वये गुन्हा केल्यामुळे फौजदारी प्रक्रियासंहिताचे कलम ३४० सहकलम १९५ च्या तरतुदी प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात का येवू नये? मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाची कारणे दाखवा नोटीस**
* **दै.साहसिक संपादक रविंद्र कोटंबकार यांचे तर्फे मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर जेष्ठ विधितज्ञ ॲड.ओंकार काकडे यांनी मांडली बाजु**
* **मा.न्यायाधिश श्री.देशमुख व मा.न्यायधिश गिरडकर यांनी सत्यता पडताळणी करुन आरोपी गोयल, पडीले व बुरांडे विरोधात काढला कारणे दाखवा नोटीस**
* **मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली व मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील जेष्ठ विधितज्ञ ॲड.निलेश ओझा यांच्या मार्गदर्शनात ॲड.ओंकार काकडे, ॲड.विवेक रामटेके यांनी मागील १ वर्षापासून लढविला न्यायदानासाठी किल्ला**
* **दै.साहसिक संपादक रविंद्र एन.कोटंबकार यांना आरोपी गोयल, पडीले, बुरांडे यांनी तडीपार प्रकरणात फसविण्याचा कट रचल्याप्रकरणी त्यांचा अवमान केल्यामुळे आरोपीतांना कलम ३५७ फौजदारी प्रक्रिया संहितानुसार १ करोड रुपये नुकसान भरपाई देण्यात का येवू नये? मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने असा काढला कारणे दाखवा नोटीस**

प्रतिनिधी / २६ जुलै

वर्धा : दै.साहसिकचे मुख्य संपादक रविंद्र एन.कोटंबकार यांच्या सत्यदर्शी-पारदर्शक व भ्रष्टाचार करणाऱ्यां नेत्यांच्या,अधिकाऱ्यांच्या विरोधात तक्रारी विषयांबाबतच्या लिखाणामुळे अडचणीत येणाऱ्या काही राजकीय लोकांनी तडीपार करण्याची विनंती थेट महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गृहराज्यमंत्री यांना केली त्यांच्या विनंतीचा सन्मान करीत वर्ध्याचे तत्कालीन पोलिस अधिक्षक अंकित गोयल, डी.वाय.एस.पी. माधव पडीले व ठाणेदार मुरलीधर बुरांडे या त्रिरत्नांनी कट रचून रविंद्र कोटंबकार यांना तडीपार करण्यासाठी खोटे व बनावट कागदपत्रे बनवून उपविभागीय अधिकारी (महसुल) वर्धा यांना सादर केले होते. या विरोधात रविंद्र कोटंबकार यांनी त्यांचे वकील ॲड.विवेक रामटेके यांच्यावतीने दि.२६/१२/२०१६ भादंविचे कलम ३४० सहकलम १९५ च्या तरतुदीप्रमाणे व मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी केनिथ देसा व इतर विरुद्ध गोपाल लिलाधर सारंग क्रिमिनल अप्लीकेशन नं. ११९५/२००७ दि.११ जुलै २००७ रोजी सदर प्रकरणात दिलेल्या आदेशान्वये आरोपीचे विरोधात वेगळी स्वतंत्र केस रजिस्टर्ड करुन शिक्षा देण्यात यावी. २००७,ए.ए.ला.ए.ला.ए.म.आर. (सी.आर.एफ.) २२८१ तसेच भारतीय दंड विधानाचे कलम १९१, १९२, १९३, १९९, २००, ४६५, ४६६, ४८७, ४७२, ४७४ व १२० (ब) प्रमाणे गुन्हा केल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा. तसेच ४६६, ४६७ चे कलम अजामिनपात्र असल्यामुळे आरोपी अंकित गोयल, माधव पडीले व मुरलीधर बुरांडे या आरोपीतांना जेलमध्ये ठेवून कारवाई करावी अशी विनंती मा. न्यायधिश नागपूर खंडपिठ यांना केली. तसेच फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३५७ फौजदारी प्रक्रिया संहिताप्रमाणे प्रत्येकी १ करोड रुपये नुकसान भरपाई आरोपी अंकित गोयल, माधव पडीले व मुरलीधर बुरांडे यांनी रविंद्र कोटंबकार यांना द्यावी, अशी विनंती तत्कालीन उपविभागीय अधिकारी, श्री.भुगांवकर यांना केली होती. तेव्हा मा. भुगांवकर, उपविभागीय अधिकारी, महसुल, वर्धा यांना केली असता त्यांनी मी सदर आरोपीतांवर कारवाई करु शकत नाही? असा आदेश पारीत केलर. या आदेशाविरोधात अर्जदार रवीद्र कोटंबकार यांनी मा.उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे याचिका दाखल करावी असा आदेश केला.

अर्जदार रविंद्र कोटंबकार यांनी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे जेष्ठ विधितज्ञ ॲड.ओंकार काकडे यांच्यावतीने मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठाचे तत्कालीन न्यायाधिश वासंती नाईक व न्यायधिश मुरलीधर गिरडकर यांच्या न्यायालयात आरोपी अंकित गोयल, डीवायएसपी माधव पडीले, ठाणेदार मुरलीधर बुरांडे यांचे विरोधात गुन्हे दाखल करुन अर्जदार रविंद्र कोटंबकार यांना १ कोटी आर्थिक नुकसान भरपाई देण्याकरीता याचीका दाखल केली होती. तेव्हा न्यायधिश मा.वासंती नाईक व न्यायधिश मा.एम.पी.गिरडकर यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करत अर्जदार कोटंबकार यांचे विरोधात पोलिस कोणतीही कारवाई करु शकते ? असा आदेश पारित करुन अपिल खारीज केली. त्यावेळी मुंबई येथील राष्ट्रीय मानवधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.निलेश ओझा यांनी न्यायमुर्ती वासंती नाईक व न्यायमूर्ती गिरडकर यांचे विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणी महामहीम राष्ट्रपती व मा.सर्वोच्च न्यायालयात केली. मा.राष्ट्रपती यांनी न्यायमुर्ती वासंती नाईक यांच्या विरोधात कारवाई करण्याची परवानगी ॲड.निलेश ओझा यांना दिली. तसेच पुन्हा पुर्नयाचिका मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायधिश पि.एन.देशमुख व मा.न्यायधिश एम.जी.गिरडकर यांच्या खंडपीठापुढे दि. २५/७/ २०१८ रोजी सुनावणीकरीता आली असता ॲड.ओंकारजी काकडे यांनी आरोपी अंकित गोयल, माधव पडीले व मुरलीधर बुरांडे यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करता कायदा पायदळी तुडवून निरअपराध असलेल्या रविंद्र कोटंबकार यांना सुडबुद्धीने तडीपार करण्याचा खोटा व बनावटी प्रस्ताव तयार करुन तत्कालीन उपविभागीय अधिकारी (महसुल) वर्धा यांच्याकडे सादर केला आहे. यामुळे तत्कालीन वर्धा पोलिस अधिक्षक अंकित गोयल, तत्कालीन वर्धा

आरोपी अंकित गोयल तत्कालीन पोलीस अधिक्षक, वर्धा

आरोपी माधव पडीले तत्कालीन डि.वाय.एस.पी, वर्धा

आरोपी मुरलीधर बुरांडे पोलीस निरीक्षक, पुलगाव, जि.वर्धा

(उर्वरित पान २ वर)

पश्चिम बंगालचं नाव 'बांगला' करण्यास विधानसभेची मंजुरी

वृत्तसंस्था / २६ जुलै

कोलकाता : पश्चिम बंगालचं नाव बदलून 'बांगला' करण्यास राज्याच्या विधानसभेने मंजुरी दिली आहे. पश्चिम बंगाल विधानसभेने राज्याचं नाव बदलण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर केला आहे. इंग्रजीतील वर्णमालेनुसार पश्चिम बंगालच नाव सर्वात खाली येतं. त्यामुळे वर्णमाला क्रमात राज्याचं नाव वर यावं यासाठी ममता बॅनर्जी सरकारने हा निर्णय घेतला आहे.

मात्र विधानसभेने प्रस्ताव मंजूर केल्यानंतरही राज्याला केंद्रीय गृह मंत्रालयाच्या मंजुरीची वाट पाहावी लागणार आहे. हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी गृह मंत्रालयाकडे पाठवण्यात येईल. गृह मंत्रालयाने हिरवा कंदील दिल्यास, पश्चिम बंगालचं नाव 'बांगला' होईल.

याआधी केंद्र सरकारने २०१६ मध्ये पश्चिम बंगाल सरकारच्या तीन नावांचा प्रस्ताव फेटाळला होता. राज्याचं बंगाली भाषेत 'बांगला', इंग्लिश भाषेत 'बेंगाल' आणि हिंदी भाषेत 'बंगाल' करण्यात यावं, असा प्रस्ताव पश्चिम बंगाल सरकारने दिला होता. परंतु एकाच राज्याचे तीन वेगवेगळ्या भाषेत, तीन वेगवेगळी नावं असू शकत नाहीत, असं सांगत केंद्र सरकारने हा प्रस्ताव फेटाळला होता.

तर त्याआधी २०११ मध्ये ममता बॅनर्जी सरकारने राज्याचं नाव बदलून 'पश्चिम बंगो' करण्याचा

माझ्या टेबलवर फाईल असती, तर कधीच मराठा आरक्षण दिलं असतं : पंकजा मुंडे

विशेष प्रतिनिधी/ २६ जुलै

बीड: 'माझ्या टेबलवर मराठा आरक्षणाची फाईल असती, तर क्षणाचाही विलंब न करता आरक्षण दिले असते. पण हे प्रकरण कोर्टात असल्याने विलंब होत आहे,' असं राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या. पंकजा मुंडे यांनी आज बीडमधील परळीत ठिय्या आंदोलन करणाऱ्या मराठा मोर्चेकऱ्यांची भेट घेतली. यावेळी त्या बोलत होत्या.

पंकजा मुंडे म्हणाल्या, तुमचा आक्रोश ऐकण्यासाठी आले आहे. मी तुम्हाला वाकायला सांगणार नाही. मी तुमची दूत बनणार आहे. तुमच्यासाठी मी मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांपर्यंत जाणार आहे. मी शिवरायांची शपथ घेऊन सांगते की जर माझ्या टेबलवर मराठा आरक्षणाची फाईल असती, तर मी क्षणाचा विलंब न करता आरक्षण दिले असते. पण हे प्रकरण कोर्टात असल्याने विलंब होत आहे.

'आज मी तुम्हाला एक शपथ देण्यासाठी आले आहे. जीव गमावू नका...माझ्या वाघांनो जीव देऊ नका...जीव घ्या, आमचा जीव घ्या.', असं पंकजा मुंडे म्हणाल्या, तसेच, आरक्षणासंदर्भात अधिवेशन घेण्यासंदर्भात मी मुख्यमंत्र्यांना मागणी करणार आहे, असे आश्वासनही पंकजा मुंडेंनी दिले.

मराठा आरक्षणासाठी भाजपा आमदाराची राजीनाम्याची तयारी



मराठा आरक्षणासाठी भाजपा आमदार डॉ. राहुल आहेर यांनी राजीनाम्याची तयारी दर्शवली आहे. आहेर यांनी मराठा आंदोलकांकडे राजीनामा सोपवला असून समाजाला जेव्हा गरज पडेल तेव्हा त्यांनी हा राजीनामा विधानसभा अध्यक्षांकडे सोपवावा, असे त्यांनी म्हटले आहे. वेळप्रसंगी समाजासाठी बलिदान द्यायलाही तयार आहे, असेही त्यांनी सांगितले. तर दुसरीकडे पश्चिम सिडको विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या नाशिकमधील पहिल्या महिला आमदार सीमा हिरे यांनीही आपला राजीनामा आंदोलकांकडे सोपवला आहे.

काकासाहेब शिंदे या आंदोलकाच्या मृत्यूनंतर मराठा आंदोलनाचे स्वरूप तीव्र झाले असून नाशिकमधील चांदवड- देवळा मतदारसंघातील आमदार डॉ. राहूल आहेर यांनी गुरुवारी मराठा आरक्षणाला पाठिंबा दिला. मराठा आरक्षणाच्या मागणीला माझे समर्थन असून मी मराठा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडे पदाचा राजीनामा सोपवत आहे. समाजासाठी जेव्हा गरज पडेल तेव्हा त्यांनी हा राजीनामा विधानसभा अध्यक्षांकडे सोपवावा, असे त्यांनी आंदोलकांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

आंदोलकांशी चर्चा केल्यानंतर आमदार राहूल आहेर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. मराठा आरक्षणासंदर्भात हायकोर्टातून उचित निर्णय मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. मराठा समाजाला हक्क मिळालाच पाहिजे, या समाजाला आंदोलनाची वेळ यावी हे दुर्दैव असून मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीत दिरंगाई होत असेल तर सरकारने हा प्रश्न त्वरित मार्गी लावावा, अशी मागणी त्यांनी केली.

राहूल आहेर यांनी राजीनाम्याची तयारी दर्शवल्याने भाजपाची नाचक्की झाली आहे. भाजपाकडून आमदार आहेर यांच्या इशाऱ्यावर कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

दरम्यान, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी अध्यादेश न काढल्याचे कारण देत कन्नड मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार हर्षवर्धन जाधव यांनी बुधवारी आमदारकीचा राजीनामा दिला होता. मी माझ्या मतदारसंघात हिरो असून दोन वेळा निवडून आलो आहे. त्यामुळे मी दिलेला राजीनामा स्वत:ची प्रतिमा उजळ करण्यासाठी दिलेला नाही, असे त्यांनी सांगितले.

पाकिस्तान निवडणूक: इम्रान खान यांचा पक्ष बहुमताच्या दिशेने...

मोहम्मद अली जीना यांच्या स्वप्नातला पाकिस्तानात साकारणार : इम्रान खान

वृत्तसंस्था / २६ जुलै

इस्लामाबाद : पाकिस्तानात पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत इम्रान खान यांचा तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यांच्या पक्षाने १२० जागा जिंकल्या आहेत. या मोठया विजयाबद्दल इम्रान खान पत्रकार परिषदेला संबोधित करत आहेत.

माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांचा पीएमएल-एन आणि तहरीक-ए-इन्साफच्या जागांमध्ये बरेच अंतर आहे. अजूनही काही भागात मतमोजणी सुरु आहे. पाकिस्तानच्या संसदेत २७२ जागा असून त्यापैकी १२० जागांवर इम्रान यांचा पक्ष आघाडीवर आहे. पाकिस्तानातील अन्य पक्षांनी ही निष्पक्ष निवडणूक नसल्याचा आरोप केला आहे. इम्रान खान यांच्या तहरीक-ए-इन्साफ पक्षाने सर्वाधिक जागांवर आघाडी घेतली असली तरी ते अजूनही बहुमतापासून दूर आहेत. बहुमतासाठी १३७ जागा आवश्यक आहेत. त्यामुळे इम्रान यांना पंतप्रधानपदाचे स्वप्न साकार करण्यासाठी अन्य छोटया पक्षांची मदत घ्यावी लागणार आहे. पक्षाच्या समर्थकांनी पाकिस्तानातील रस्त्यांवर जल्लोष सुरु केला आहे.